# १. आपल्या संविधानाची ओळख

**चला, थोडी उजळणी करूया !**

यामागील इयत्तांच्या नागरिकशास्त्राच्या पाठ्यपुस्तकांमध्ये आपण नियमांच्या आवश्यकतेविषयीचे बरेच मुद्दे समजून घेतले. कुटुंब, शाळा, आपले गाव किंवा शहर यांचे व्यवहार सुरळीतपणे चालावेत म्हणून आपण संकेत व नियम पाळतो. कुटुंबात नियम नसतात, परंतु प्रत्येक कुटुंबातील सदस्यांनी कसे वागावे याविषयी काही संकेत असतात. शाळेत प्रवेशासंबंधी, गणवेश आणि अभ्यास यांविषयी नियम असतात. विविध स्पर्धांचेही नियम असतात. आपल्या गावाचा आणि शहराचा कारभारही नियमांनुसार चालतो. याचप्रमाणे आपल्या देशाचा कारभारही नियमांनुसारच चालतो. कुटुंब, शाळा, गाव अथवा शहरांसंबंधी असणारे नियम मर्यादित स्वरूपाचे असतात, परंतु देशाच्या कारभारासंबंधीचे नियम किंवा तरतुदी मात्र व्यापक असतात.

समीर आणि वंदनाला पडलेले प्रश्न तुम्हांला विचारावेसे वाटतात का ?

- देशाचा कारभार ज्या नियमांनुसार किंवा तरतुदींनुसार चालतो, ते नियम कुठे असतात ?
- ते नियम कोण तयार करते ? त्यांचे पालन बंधनकारक असते का ?

खालील मजकुरात तुम्हांला त्याची उत्तरे सापडतात का बघा.

**संविधान : अर्थ**

देशाच्या कारभारासंबंधीच्या तरतुदी एकत्रितपणे व सुसूत्रपणे ज्या ग्रंथात नमूद केलेल्या असतात त्याला 'संविधान' असे म्हणतात. याचाच अर्थ संविधान म्हणजे देशाच्या राज्यकारभारासंबंधीच्या तरतुदींचा लिखित दस्तऐवज होय. जनतेकडून निवडून आलेल्या प्रतिनिधींमधून शासन किंवा सरकार स्थापन केले जाते. संविधानातील तरतुदींनुसारच राज्यकारभार करण्याचे शासनावर बंधन असते. संविधानातील तरतुदी किंवा त्यात नमूद केलेला कायदा मूलभूत असतो. संविधानास विसंगत ठरतील असे कायदे शासनाला करता येत नाहीत. असे केल्यास ते कायदे न्यायमंडळ रद्द ठरवू शकते.

**संविधानातील तरतुदी :**

संविधानातील तरतुदी अनेकविध बाबींविषयी असतात. उदा., नागरिकत्व, नागरिकांचे हक्क, नागरिक आणि शासनसंस्था यांच्यातील संबंध, शासनाने करायच्या कायद्यांचे विषय, निवडणुका, शासनावरील मर्यादा व राज्याचे अधिकारक्षेत्र इत्यादी.

संविधानानुसार राज्यकारभार करण्याचे तत्त्व बहुतेक सर्वच देशांनी स्वीकारले आहे. असे असले तरी प्रत्येक देशाच्या संविधानाचे स्वरूप वेगवेगळे असते. इतिहास, समाजरचना, संस्कृती, परंपरा इत्यादी बाबतींत देशादेशांमध्ये भिन्नता असते किंवा वेगळेपण असते. त्याचप्रमाणे राष्ट्रांच्या गरजा व उद्दिष्टेही भिन्न असू शकतात. त्यास अनुरूप असे संविधान निर्माण करण्याचा प्रयत्न ते ते राष्ट्र करते.



**माहीत आहे का तुम्हांला ?**

अमेरिका, इंग्लंड या देशांचा राज्यकारभार संविधानानुसार चालतो, परंतु दोन्ही संविधानांमध्ये फरक आहे. उदा., अमेरिकेचे संविधान इ.स.१७८९ मध्ये अमलात आले. ते लिखित असून त्यात केवळ ७ कलमांचा समावेश आहे. परंतु २२५ वर्षांपेक्षा अधिक काळ लोटला असूनही त्याच संविधानानुसार आजही अमेरिकेचा राज्यकारभार चालवला जातो.

इंग्लंड या देशाला अनेक शतकांचा इतिहास आहे. राज्यकारभाराविषयीचे नियम या देशात संकेत, रूढी, परंपरेच्या स्वरूपांत आढळतात. तरीपण त्यांचे काटेकोरपणे पालन केले जाते. १२१५ साली झालेल्या मॅग्नाकार्टा करारापासून इंग्लंडचे संविधान विकसित होत गेले. काही लिखित नियमांचा समावेश असला तरी इंग्लंडचे संविधान प्रामुख्याने अलिखित आहे.



**चला, शोधू या !**

तुम्हांला आवडणाऱ्या कोणत्याही एका देशाच्या संविधानाविषयी खालील मुद्द्यांच्या आधारे थोडक्यात माहिती मिळवा :

देशाचे नाव, संविधान निर्मितीचे वर्ष, संविधानाची दोन वैशिष्ट्ये.

**संविधानाची आवश्यकता :** संविधानात नमूद केलेल्या तरतुदींनुसार किंवा नियमांनुसार राज्यकारभार करण्याचे अनेक फायदे असतात.

- शासनाला नियमांच्या चौकटीत राहूनच राज्यकारभार करावा लागतो. त्यामुळे त्यांना मिळालेल्या अधिकाराचा किंवा सत्तेचा दुरुपयोग होण्याची शक्यता कमी असते.
- संविधानात नागरिकांचे हक्क व त्यांच्या स्वातंत्र्याचा उल्लेख असतो. शासनाला ते हक्क हिरावून घेता येत नाहीत म्हणून नागरिकांचे हक्क व स्वातंत्र्य सुरक्षित राहते.
- संविधानातील तरतुदींनुसार राज्यकारभार करणे म्हणजे कायद्याचे राज्य प्रस्थापित करण्यासारखे आहे. कारण त्यात सत्तेच्या गैरवापराला किंवा मनमानी कारभाराला वाव नसतो.
- संविधानानुसार राज्यकारभार होत असल्याचे पाहून सामान्य माणसांचा शासनावरील विश्वास वाढतो. त्यातून ते सहभागाला उत्सुक होतात. सामान्य माणसांच्या वाढत्या सहभागामुळे लोकशाही अधिक मजबूत होते.
- संविधान त्या त्या देशासमोर काही राजकीय आदर्श ठेवते. त्या दिशेने वाटचाल करण्याचे बंधनही त्या राष्ट्रावर असते. त्यातून जागतिक शांतता व सुरक्षितता, मानवी हक्कांचे संवर्धन होण्यास पोषक वातावरण निर्माण होते.
- नागरिकांच्या कर्तव्यांचा उल्लेख संविधानात असल्याने नागरिकांची जबाबदारीही निश्चित होते.

### राज्यकारभार म्हणजे काय ?

देशाच्या राज्यकारभारात कोणत्या बाबी सामावलेल्या असतात ?


देशाच्या सीमारेषांचे संरक्षण करणे, परकीय आक्रमणापासून जनतेचे रक्षण करणे इथपासून ते दारिद्र्य निर्मूलन, रोजगार निर्मिती, शिक्षण व आरोग्य सेवा, उद्योग व्यवसायांना प्रोत्साहन, दुर्बल घटकांचे संरक्षण, महिला, बालके व आदिवासींच्या प्रगतीसाठी उपाययोजना इत्यादी अनेक विषयांबाबत शासनाला कायदे करावे लागतात. कायद्याच्या अंमलबजावणीद्वारे समाजात योग्य ते बदल घडवून आणावे लागतात. थोडक्यात सांगायचे झाल्यास आधुनिक काळातील शासनाला अवकाश संशोधनापासून ते सार्वजनिक स्वच्छतेपर्यंतच्या सर्व बाबींसंबंधी निर्णय घ्यावे लागतात. यालाच राज्यकारभार असे म्हणता येईल.

संविधानाचा अर्थ व त्याची आवश्यकता समजून घेतल्यानंतर आता आपण भारताच्या संविधानाची निर्मिती कशी झाली हे जाणून घेऊ.

**संविधान निर्मितीची पार्श्वभूमी :** भारताच्या संविधान निर्मितीला इ.स.१९४६ पासूनच सुरुवात झाली. स्वतंत्र भारताचा राज्यकारभार ब्रिटिशांनी तयार केलेल्या कायद्यानुसार चालणार नाही तर तो भारतीयांनी स्वतः तयार केलेल्या कायद्यानुसार चालेल असा स्वातंत्र्य चळवळीतील नेत्यांचा आग्रह होता. त्यानुसार भारताचे संविधान तयार करण्यासाठी

एक समिती स्थापन करण्यात आली. ती समिती 'संविधान सभा' म्हणून ओळखली जाते.

**संविधान सभा :** आपला देश १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वतंत्र झाला. तत्पूर्वी भारतावर इंग्रजांचे राज्य होते. इंग्रज सरकारने राज्यकारभाराच्या सोईसाठी मुंबई प्रांत, बंगाल प्रांत व मद्रास प्रांत यांसारखे विभाग पाडले होते. या प्रांतांमधील कारभार तेथील लोकप्रतिनिधींमार्फत चालवला जात होता. त्याचबरोबर देशातील काही भागांचा कारभार तेथील स्थानिक राजे पाहत होते. अशा भागांना संस्थाने म्हणत व त्यांचे प्रमुख संस्थानिक म्हणून ओळखले जात. संविधान सभेत प्रांत आणि संस्थानांचे प्रतिनिधी यांचा समावेश होता.


डॉ.राजेंद्रप्रसाद

संविधान सभेत एकूण २९९ सदस्य होते. डॉ.राजेंद्रप्रसाद हे संविधान सभेचे अध्यक्ष होते.

**डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे मसुदा समितीचे अध्यक्ष होते. त्यांचा विविध देशांच्या संविधानांचा गाढा अभ्यास होता. त्यांनी अहोरात्र अभ्यास व चिंतन करून संविधानाचा मसुदा तयार केला. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी तयार केलेला संविधानाचा मसुदा संविधान सभेपुढे मांडण्यात आला. त्यावर कलमवार चर्चा झाली. अनेक दुरुस्त्या सुचवण्यात आल्या. संविधानाचा मसुदा संविधान सभेपुढे मांडण्याचे, त्याविषयी विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे देण्याचे, तसेच संविधान सभेच्या सूचनांनुसार मूळ मसुद्यात फेरबदल करण्याचे, प्रत्येक तरतूद निर्दोष करण्याचे काम डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी केले. भारताच्या संविधान निर्मितीतील या योगदानामुळे त्यांना 'भारतीय संविधानाचे शिल्पकार' म्हणतात.


डॉ.बाबासाहेब आंबेडकर

संपूर्ण संविधान लिहून पूर्ण झाल्यानंतर संविधान सभेने त्यास मान्यता दिली व त्याचा स्वीकार २६ नोव्हेंबर १९४९ रोजी केला. म्हणून २६ नोव्हेंबर हा दिवस 'संविधान दिन' म्हणून साजरा केला जातो. २६ जानेवारी १९५० पासून संविधानातील तरतुदींनुसार

**किती अभिमानास्पद बाब आहे ही !**

- संविधान सभेत चर्चा व विचारविनिमयाच्या आधारे निर्णय घेण्यात आले. विरोधी मतांचा आदर व त्यांच्या योग्य सूचनांचा स्वीकार हे तेथील कामकाजाचे वैशिष्ट्य होते.
- संविधान लिहून पूर्ण करण्यासाठी २ वर्षे, ११ महिने आणि १७ दिवस इतका कालावधी लागला.
- मूळ संविधानात २२ भाग, ३९५ कलमे आणि ८ परिशिष्टे यांचा समावेश होता.




**माहीत आहे का तुम्हांला?**

संविधान सभेत डॉ. राजेंद्रप्रसाद, पं. जवाहरलाल नेहरू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सरदार वल्लभभाई पटेल, मौलाना अबुल कलाम आझाद, सरोजिनी नायडू, जे.बी. कृपलानी, राजकुमारी अमृत कौर, दुर्गाबाई देशमुख, हंसाबेन मेहता असे अनेक मान्यवर सदस्य होते. बी.एन.राव या कायदेतज्ज्ञाची संविधान सभेचे कायदेविषयक सल्लागार म्हणून नेमणूक झाली होती.

देशाचा राज्यकारभार चालवण्यास सुरुवात झाली. या दिवसापासून भारताचे प्रजासत्ताक राज्य अस्तित्वात आले. म्हणूनच २६ जानेवारी हा दिवस आपण 'प्रजासत्ताक दिन' म्हणून साजरा करतो.



पं.जवाहरलाल नेहरू



सरदार वल्लभभाई पटेल



मौलाना आझाद



सरोजिनी नायडू

**करून पहा.**

तुमच्या वर्गाचा कारभार नियमांनुसार चालावा असे तुम्हांला वाटते ना ? त्यात कोणत्या नियमांचा तुम्ही समावेश कराल ? तर मग वर्गासाठी एक नियमावली तयार करा.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान जलव्यवस्थापन, परराष्ट्र संबंध, राष्ट्रीय सुरक्षा, पत्रकारिता, अर्थकारण, सामाजिक न्याय अशा विविध क्षेत्रांत होते.



भारतीय संविधानाचा मसुदा संविधान सभेचे अध्यक्ष डॉ.राजेंद्रप्रसाद यांना सादर करताना डॉ.बाबासाहेब आंबेडकर

## स्वाध्याय

**१. पुढील संकल्पना स्पष्ट करा.**

(१) संविधानातील तरतुदी

(२) संविधान दिन

**२. चर्चा करा.**

(१) संविधान समितीची स्थापना केली गेली.

(२) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना भारतीय संविधानाचे शिल्पकार म्हणतात.

(३) देशाच्या राज्यकारभारात समाविष्ट असणाऱ्या बाबी.

**३. योग्य पर्याय निवडा.**

(१) कोणत्या देशाचे संविधान पूर्णतः लिखित नाही ?

(अ) अमेरिका (ब) भारत

(क) इंग्लंड (ड) यांपैकी नाही.

(२) संविधान सभेचे अध्यक्ष कोण होते ?

(अ) डॉ.बाबासाहेब आंबेडकर

(ब) डॉ.राजेंद्रप्रसाद

(क) दुर्गाबाई देशमुख

(ड) बी.एन.राव

(३) खालीलपैकी कोण संविधान सभेचे सदस्य नव्हते ?

(अ) महात्मा गांधी

(ब) मौलाना आझाद

(क) राजकुमारी अमृत कौर

(ड) हंसाबेन मेहता

(४) मसुदा समितीचे अध्यक्ष कोण होते ?

(अ) डॉ. राजेंद्रप्रसाद

(ब) सरदार वल्लभभाई पटेल

(क) डॉ.बाबासाहेब आंबेडकर

(ड) जे.बी.कृपलानी

**४. तुमचे मत लिहा.**

(१) शासनाला कोणकोणत्या विषयांवर कायदे करावे लागतात ?

(२) २६ जानेवारी हा दिवस आपण प्रजासत्ताक दिन म्हणून का साजरा करतो ?

(३) संविधानातील तरतुदींनुसार राज्यकारभार करण्याचे फायदे.

**उपक्रम**

(१) संविधान सभेसाठी विविध समित्यांची स्थापना झाली. त्यांच्याविषयी माहिती मिळवा व समित्यांच्या नावांचा तक्ता तयार करा आणि नावांसह चित्रांचा संग्रह करा.

(२) 'संविधान दिन' शाळेत कसा साजरा झाला त्याचा अहवाल तयार करा.

(३) संविधान सभेतील सदस्यांच्या फोटोंचा संग्रह करा.